<u>नि. फौ. ख. क्र.३२८/२०२१</u> निशाणी २४

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्र.३ यांचा शपथेवर जबाब</u>**
**<u>मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,</u>**

नाव – गणेश ज्ञानदेव गावंडे

वय – ५५ वर्षे, व्यवसाय – पोलीस हवालदार, पो.स्टे. मुर्तिजापूर ग्रामीण

पत्ता – रा. लहरिया नगर, अकोला, ता. जि. अकोला.

**<u>सरकारतर्फे सरकारी वकिल श्रीमती फौजिया तबस्सुम अब्दुल सादिक यांचेमार्फत सरतपास सुरुः</u>**

१. मी बाळापूर पो.स्टे. येथे सन २०२०–२०२१ या कालावधीमध्ये पोलीस नाईक म्हणून कार्यरत होतो. दि.२४.०४.२०२१ च्या रात्री मी वाडेगाव येथील पोलीस चौकीमध्ये कर्तव्यावर होतो. मी हे.कॉ. विनायक पवार यांच्यासोबत वाडेगाव परिसरात खाजगी वाहनाने पेट्रोलिंग करीत असताना रात्री १२.२० वा. सुमारास विनायक पवार यांना माहिती मिळाली की, तामसी या दिशेकडून एक इसम गणेश सुखदेव राहुळकर हा विना परवाना रेती चोरुन घेवून वाडेगाव कडे येत आहे. म्हणून आम्ही पीएसआय वासाळे यांना माहिती दिली व विनायक पवार यांनी दोन पंचांना बोलावून पंचनाम्याकामी येण्यास सांगितले. त्यानंतर आम्ही सदर बातमीची शहानिशा करण्याकरीता मी, पीएसआय वासाळे, विनायक पवार, २ होमगार्ड व २ पंच असे मिळून मिळालेल्या बातमीच्या ठिकाणी गेलो. आम्ही शालीग्राम इंगळे यांच्या घराजवळ नाकाबंदी केली असता एक इसम लाल रंगाचा महिंद्रा ट्रॅक्टर घेवून तामसी कडून वाडेगावकडे येताना दिसला. आम्ही त्यास थांबवून ट्रॅक्टरच्या ट्रॉलीमध्ये १ ब्रास रेती मिळून आली. सदर चालकास त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव गणेश सुखदेव राहुडकर, रा वाडेगाव असल्याचे सांगितले. त्यास रेती वाहतूकीबाबत परवाना विचारले असता त्याने त्याच्याकडे परवाना नसल्याचे सांगितले म्हणून विनायक पवार यांनी सदर वाहन ट्रॉली व रेतीसह दोन पंचासमक्ष जप्त करुन त्याचा पंचनामा केला. त्यानंतर सदर ट्रॅक्टर व आरोपी यास मिळून आलेल्या रेतीसह पो.स्टे. बाळापूर येथे आणले. त्यानंतर विनायक पवार यांनी सदर वाहन चालकाविरुध्द फिर्याद दिली. सदर ट्रॅक्टरचा क्र. एचएच३०/बी.बी./११२८ असा होता. मी सदर वाहनचालकास

पाहिल्यास ओळखू शकतो. आरोपी आज न्यायालयात उपस्थित नाही, त्याच्या ओळखीविषयी कोणताही वाद नाही.

सरतपास पूर्ण.

**<u>मध्यान्हाची वेळ झाली असल्यामुळे साक्षीदाराचा उलटतपास दुपारच्या सत्रापर्यंत तहकुब करण्यात येत आहे.</u>**

दिनांक : १२.१२.२०२५.
ठिकाणः बाळापूर

( डी. एम. वाघमारे )
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र.२), बाळापूर.

**<u>मध्यान्हानंतर आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. एस. एम. डोंगरे यांचे मार्फत उलटतपास शपथेवर सुरुः</u>**

२. घटनास्थळाच्या चतुःसिमा मी सांगू शकतो. घटनास्थळाच्या पुर्वेस वाडेगावकडे जाणारा रस्ता, पश्चिमेश तामसी गाव, दक्षिणेस लोकवस्ती, उत्तरेस शेती आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगितल्याप्रमाणे कोणतीही घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

**दिनांकः– १२.१२.२०२५**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत**

DAYANAND MARUTI WAGHMARE
Digitally signed by DAYANAND MARUTI WAGHMARE
Date: 2025.12.12 16:39:52 +0530

**(डी. एम. वाघमारे)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**(न्यायालय क्र.२), बाळापूर.**

<u>प्रमाणपत्र</u>

मी अधिकथन करतो की, पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णय/आदेश/ पुरावा मधील शब्द नि शब्द हे मुळ न्यायनिर्णय/पुरावा/आदेशाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | :– | **श्री. डी. एम. वाघमारे,**<br>सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर. |
| लघुलेखकाचे नाव | :– | अजय एन. हांडे |
| घोषित दिनांक | :– | १२/१२/२०२५ |
| न्यायनिर्णय/ आदेश/ पुराव्यावर पिठासीन अधिकारी यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | :– | १२/१२/२०२५ |
| अपलोड केल्याचा दिनांक | :– | १२/१२/२०२५ |